I J R S S I S, Vol. VIII, Issue (3), May-2022 : 191-193
A Double-Blind Peer Reviewed Journal
OPEN ACCESS
e-ISSN 2347 – 8268 & 2347-8209 (P)
Original Article
Reg. No. : MH-NGP/0000167
INTERNATIONAL JOURNAL OF RESEARCHES IN SOCIAL SCIENCE AND INFORMATION STUDIES
© VMS RESEARCH FOUNDATIONwww.ijrssis.in

# समाजार्थिक स्तराचा विवाहावर होणारा परिणाम

प्रा. सौ. मनिषा म. शुक्ला

गृहअर्थशास्त्र विभाग,
अण्णासाहेब गुंडेवार महाविद्यालय, काटोल रोड नागपूर
Corresponding Author : manishashukla122@gmail.com

Communicated : 28.03.2022 | Revision : 02.04.2022 Accepted : 08.04.2022 | Published : 02.05.2022

**सारांश :**

विवाह हे एक स्त्री व पुरूष अशा दोन व्यक्तिमधील सामाजिक बंधन आहे. हिंदू धर्मियात विवाह हा एक संस्कार आहे. तर अन्य धर्मियात हा कायदेशीर अधिकार असतो. विवाह हा संतती किंवा वंश पुढे नेण्यासाठीचा कायदेशीर व सामाजिक मार्ग आहे

आजच्या तरूणं मुला–मुलींमध्ये शिक्षण आणि आर्थिक स्वावलंबणामुळे आत्मविश्वास वाठला आहे. करियला विशेष महत्त्व दिल्यामुळे विवाहाचे स्थान दृय्यम होते. आणि विवाह टाळल्या जातात. आपल्यापेक्षा कमी असलेल्या पुरूषाणे नाकारले तर! हि भिती असल्यामुळे विवाह करण्यासाठी नकार दिला जातो.

सर्वप्रथम कुटूंबामध्ये त्यांच्या "लगन न करण्याच्या" निर्णया बदल नाराजी असते. कैटूबिक वातावरणात तणाव निर्माण होतो. समाजात सुध्दा संमान मिळत नाही. व बरेचदा अवहेलणा होते. सामाजिक ताण सहण करावा लागतो. त्यामुळे अविवाहीत तरूण–तरूणीं मध्ये सामाजिक समस्या वाढू लागल्या आहे. हया सामाजिक समस्या वेगवेगळया सामाजार्थिक स्तरानुसार वेगवेळी असतात का ? हया प्रश्नाचे समाधान उलगडून काळण्यासाठी हया प्रस्तूत विषयाच्या अध्ययनाची गरज आहे. प्रस्तुत विषयाच्या अध्ययना करिता नागपूर शहराच्या १८–३५ हया वयोगटातील ५० अविवाहीत तरूण व ५० अविवाहीत तरूणींची स्तरित यादृच्छिक नमुना निवड पध्दतीचा उपयोग करूण एकुण १०० तरूणाची नमुना म्हणुन निवड करण्यात आली. हय Socio Economic Status Scals By (B.G.Prasad) हयांच्या द्वारे निर्मित प्रश्नावलीचा उपयोग करून सांखिकीय विशलेषणा करीता मध्य, प्रमाण विचलन, व विचरण हयांचा उपयोग करून निष्कर्ष काढण्यात आले. १) अतिशय उच्च सामाजर्थिक स्तराच्या उत्तरदात्याचे सामाजिक समायोजनेचा विवाहावर होणारा परिणाम सर्वात चांगला आहे. २) सौम्य समाजार्थिक स्त्रांच्या उत्तरदात्याचे सामाजिक समायोजनेचे विवाहावर होणारा परिणाम सर्वात चांगला आहे.

**बीजशब्द :** ग्रामीण साहित्य, ग्रामीण विकास, सामाजिक परिवर्तन, सामाजिक बांधिलकी, ग्रामीण जाणीव.

**प्रस्तावना :**

विवाह हे एक स्त्री व पुरूष अशा दोन व्यक्तिमधील सामाजिक बंधन आहे. हिंदू धर्मियात विवाह हा एक संस्कार आहे. तर अन्य धर्मियात हा कायदेशीर अधिकार असतो. विवाह हा संतती किंवा वंश पुढे नेण्यासाठीचा कायदेशीर व सामाजिक मार्ग आहे. विवाह संस्था ही संस्कृतीस आणि उपसंस्कृतीस अनुलक्षून विविध पध्दतीनी पती–पतनीमध्ये जवळकीचे आणि लैंगीक नाते मान्य करते. विवाहामुळे दोन व्यक्तिंचे नव्हे तर दोन कुटुंबे आणि त्यांचे नातेवाईक नात्याला 'लग्न गाठ' असे म्हणतात लग्न (विवाह) एक पवित्र बंधन आहे.

आजच्या तरूणं मुला–मुलींमध्ये शिक्षण आणि आर्थिक स्वावलंबणामुळे आत्मविश्वास वाठला आहे. स्वत: निर्णय घेण्याची वैचारिक क्षमता व प्रगलभतेचा वेगळा वाटा शोधण्याचे धाडस हया गोष्टीमुळे निर्माण झाले आहे. त्यामुळे अभ्यासक्रम, व्यवसाय, निवडतांना ते स्वत:च्या आवडीचा विचार करतांना दिसतात. त्यामुळे विवाहाच्या बाबतित विचार करतांना आपण आपल्या जोडीदारा सोबत सर्मपणाच्या भावणेने राहु शकू कि नाही? हया विषयी शंका त्यांच्या मनात असते. म्हणून लगनाला पर्याय नाही. हया नियमाला आवाहन देण्याची वृत्ती आज मुळ धरू लागली आहे. त्यामुळे बहुसंख्य तरूणांचा लगन न करण्याकडे वाडता कल दिसून येतो. सर्वच समाज तरूणांनी अविवाहीत राहण्याच्या विरोधात दिसून येते. आर्थिक स्वावलंबी असलेल्या प्रौढ अविवाहीत महिला सुध्दा तस्याच राहतांण दिसतात.

करियला विशेष महत्त्व दिल्यामुळे विवाहाचे स्थान दृय्यम होते. आणि विवाह टाळल्या जातात. आपल्यापेक्षा कमी असलेल्या पुरूषाणे नाकारले तर! हि भिती असल्यामुळे विवाह करण्यासाठी नकार दिला जातो.

स्वत:च्या कीरयर घडविण्याच्या महत्वकांक्षा मुळे तरूण वर्ग हया कार्यात इतका गुंतूण जातो कि आपण विवाहाचा विचार केला नाही हे त्यांचे त्यांनाच लक्षात येत नाही. त्यांनी मुदाम विवाह टाळलेला नसतो. विवाह केला पाहिजे हे त्यांना माण्य असते बहुसंख्य तंरूण लगन करूण विवाहीतही होतांत. तर आतापर्यंतची जीवन पध्दती

सुखाची होती म्हणून काही तरूण ठरवूण अविवाहीत राहतात. शिक्षण, करियर, कैटुबिक जबाबदाऱ्या मोठया बहिन भांवडाचे विवाहाचे अनुभव अश्या अनेक कारणामुळे आज समाजात अविवाहीत राहणाऱ्याच्या संख्येत वाढ होतांना दिसून येते. परंतु लगन न केल्याने त्यांना समाजामध्ये कुटूंबामध्ये अनेक प्रकारचे समायोजन करावे लागते. सर्वप्रथम कुटूंबामध्ये त्यांच्या "लगन न करण्याच्या" निर्णया बदल नाराजी असते. कैटूबिक वातावरणात तणाव निर्माण होतो. समाजात सुध्दा संमान मिळत नाही. व बरेचदा अवहेलणा होते. सामाजिक ताण सहण करावा लागतो. त्यामुळे अविवाहीत तरूण–तरूणीं मध्ये सामाजिक समस्या वाढू लागल्या आहे.

हया सामाजिक समस्या वेगवेगळया सामाजार्थिक स्तरानुसार वेगवेळी असतात का? हया प्रश्नाचे समाधान उलगडून काळण्यासाठी हया प्रस्तूत विषयाच्या अध्ययनाची गरज आहे.

**संशोधनाची उदिष्ट्ये :–**

१. सामाजार्थिक घटकांचा विवाह विषयक अभिवृत्ती आणि सामाजिक समायोजनावर होणारा परिणाम अभ्यासणे.

संशोधनाची गृहितके :–

१. मुल–मुलीच्या सामाजिक समायोजनामध्ये अडचणी येतात.

**संशोधन पध्दती :–**

प्रस्तुत विषयाच्या अध्ययना करिता नागपूर शहराच्या १८–३५ हया वयोगटातील ५० अविवाहीत तरूण व ५० अविवाहीत तरूणींची स्तरित यादृच्छिक नमुना निवड पध्दतीचा उपयोग करूण एकुण १०० तरूणाची नमुना म्हणुन निवड करण्यात आली. हयात उत्तरदात्यांची व्ययक्तीक, कौटुंबिक, आर्थिक (स्थायी व अस्थायी संपती), सामाजिक माहितीचा समावेश करूण हया आधारे उत्तरदात्यांची ५ वर्गात विभागणी करण्यात आली.

- अतिशय निम्न सामाजार्थिक स्तर
- निम्न सामाजार्थिक स्तर
- सैम्य सामाजार्थिक स्तर
- उच्च सामाजार्थिक स्तर
- अतिशय उच्च सामाजार्थिक स्तर

**संशोधनाची साधणे :–**

१) Socio Economic Status Scals By (B.G.Prasad) हयांच्या द्वारे निर्मित प्रश्नावलीचा उपयोग करून सांखिकीय विशलेषणा करीता मध्य, प्रमाण विचलन, विचरण हयांचा उपयोग करून निष्कर्ष काढण्यात आले.

**विवेचन आणि निर्वचन :–**

उत्तरदात्याच्यां सामाजार्थिक स्तराचा विवाहावर होणारा परिणाम दर्शविणारी सारणी.

| अ.क्र. | सामाजार्थिक स्तर | स्खया | मध्य | प्रमाण विचलन | विचरण |
|---|---|---|---|---|---|
| १. | अतिशय निम्न सा.स्तर | १९ | १८.८७ | ३४.३९ | ९३.२८ |
| २. | निम्न सा.स्तर | १५ | ९.५ | ३८.३३ | ३९.३१ |
| ३. | सैम्य सा.स्तर | १३ | ६.१ | १३.२२ | ९.८ |
| ४. | उच्च सा.स्तर | २० | २२.३ | १४.५५ | १०.३७ |
| ५. | अतिशय उच्च सा.स्तर | ३३ | ४८.८ | १०.४ | ६.९ |

वरिल सारणी व आलेखा वरूण उत्तरदात्यांच्या सामाजार्थिक स्तराचा सामाजिक समायोजनावर होणारा परिणाम दर्शविण्यात आला आहे. सारणीत दर्शविलेल्या माहीतीनुसार अतिशय उच्च सामजार्थिक स्तराच्या उत्तरदात्याचे सामाजिक समायोजनेचे मध्य ४८.८, प्रमाण विचलन १०.४ व विचरन ६.९ हे विचलनांक इतर सर्व समाजार्थिक स्तराच्या उत्तरदात्यांपेक्षा कमी असल्यामुळे हया उत्तरदात्यांचे सामाजिक समायोजनावर होणारा परिणाम सर्वात चांगला आहे.

त्यानंतर सौम्य समाजार्थिक स्त्रांच्या उत्तरदात्याचे सामाजिक समायोजनेचे मध्य ६.१, प्रमाण विचलन १३.२२ व विचरन ९.८ हे विचलनांक इतर सर्व समाजार्थिक स्तराच्या उत्तरदात्यांपेक्षा जास्त असल्यामुळे हया उत्तरदात्यांचे सामाजिक समायोजनावर होणारा परिणाम सर्वात चांगला आहे.

तर उच्च समाजार्थिक स्त्रांच्या उत्तरदात्याचे सामाजिक समायोजनेचे परिणाम चांगला आहे.

त्यानंतर निम्न समाजार्थिक स्त्रांच्या उत्तरदात्याचे सामाजिक समायोजनावर होणारा परिणाम फारसा चांगला नाही.

त्यानंतर अतिशय निम्न समाजार्थिक स्त्रांच्या उत्तरदात्याचे सामाजिक समायोजनावर होणारा परिणाम चांगला नसतो.

**निष्कर्ष :–**

- अतिशय उच्च सामजार्थिक स्तराच्या उत्तरदात्याचे सामाजिक समायोजनेचे विवाहावर होणारा परिणाम सर्वात चांगला आहे.
- सौम्य समाजार्थिक स्त्रांच्या उत्तरदात्याचे सामाजिक समायोजनेचे विवाहावर होणारा परिणाम सर्वात चांगला आहे.
- उच्च समाजार्थिक स्त्रांच्या उत्तरदात्याचे सामाजिक समायोजनेचे विवाहावर परिणाम चांगला आहे.

- अतिशय निम्न समाजार्थिक स्तरांच्या उत्तरदात्याचे सामाजिक समायोजनेचे विवाहावर होणारा परिणाम फारसा चांगला नसतो.
- निम्न समाजार्थिक स्तरांच्या उत्तरदात्याचे सामाजिक समायोजनावर होणारा परिणाम चांगला नसतो.

**संदर्भ :**

आयुराणी (१९९७), महिला विकास कार्यक्रम इनाश्री पब्लिषर्स जयपूर

नलिनी पी.एन (२००९), भारत में विवाह व्यवस्था प्रकाषन बुक एनक्लेव

फरकाडे त्रिवेणी (१९९९) विवाह आणि कौटुबिक विद्या प्रकाषन नागपूर

गोंगे सुलभा, संबंध

महाजन धर्मवीर (२००३) भारतीय समाज मुद्दे विवके प्रकाषन

महाजन कमलेष, एवं समस्याये

मार्क वस्र्हर्न (१९६५), विवाह आणि समाज फिनलॅन्ड निवासी

विष्व विभृत समाजषास्त्री

राजवाडे (१९७६), भारतीय विवाह संस्थेचा इतिहास, प्रागति पुस्तक, प्रकाषन पुणे